
# विलोभनीय निसर्ग रेखाटणारे रवींद्रनाथ

■ डॉ. सोमनाथ कोमरपंत

पृथ्वीवर असे प्रेम करणारा रवींद्रनाथांसारखा कवी दुर्मिळ. पहाट, दुपार आणि रात्र या प्रहरांचे त्यांनी समरसून वर्णन केलेले आहे. क्षणतरंगाचे चित्रण करताना त्यांच्यातील चित्रकार जागृत असतो. ऋतूचक्राच्या विभ्रमांचे त्यांनी विलोभनीय चित्रण केलेले आहे. त्यात त्यांनी मानवी जीवनातील सुखःदुखांचे ताणे-बाणे गुंफलेले आहेत. अशावेळी निसर्ग आणि माणूस यांच्या अद्वैतानुभूतीची आल्हाददायी रूपकळा त्यांच्या साहित्याला प्राप्त होते...



रवींद्रनाथ टागोर हे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ते जन्मले आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लौकिक जगाचा त्यांनी निरोप घेतला. ८० वर्षांचे परिपूर्ण आणि समृद्ध जीवन ते जगले. आधुनिक काळात ते वावरत होते; पण त्यांचे कविमन प्राचीन काळातील ऋषिमुनींसारखे होते. भारतवर्षाच्या अभ्युदयाविषयी त्यांचे निरंतर चिंतन चाललेले होते. त्यांनी मानवताधर्माची उपासना केली. आत्मभान आणि समाजभान यांचे अधिष्ठान त्यांच्या सर्जनशील वाङ्मयाला लाभले होते, असे दिसून येते. हस्तिदंती मनोऱ्यात त्यांनी स्वतःला बंदिस्त करून घेतले नाही. संपूर्ण आयुष्यात त्यांनी कवितेची साधना केली. निसर्गाच्या सान्निध्यात ते राहिले. स्थलकालातीत आणि श्रेष्ठ दर्जाची काव्यानिर्मिती केली. 'शांतिनेकतन' ही देखील त्यांची सर्वोत्तम आणि सर्जनशील कविताच होती. आधुनिक भारताच्या नवनिर्माणाचे स्वप्न उराशी बाळगून जे प्रयोग त्यांनी तेथील वास्तव्यात केले, त्याचे सुमधुर फलित भविष्यकाळात प्राप्त झाले. आजच्या परिभाषेत ज्याला आपण व्यवस्थापन कौशल्य आणि योजनाबद्ध कल्पकता म्हणतो, ते गुण त्यांच्या 'श्रीनिकेतन' आणि 'विश्वभारती' या संस्थांच्या उभारणीत दिसून आले. कविमनाची माणसे संस्था निर्माण करू शकत नाहीत, असे म्हणतात. रवींद्रनाथ याला अपवाद होते. या त्रयीच्या मुळाशी उन्नतीची बीजे होती. हे सारे करताना निसर्गाचा आणि माणसाचा अनुबंध त्यांनी जाणला होता. या दोहोंमध्ये जैविक नाते आहे, याचे सजग भान त्यांना होते. निसर्गाच्या सान्निध्यात आनंदमय शांती अनुभवताना, निसर्गसमाधीतून स्फुरलेल्या 'चैताली' या संग्रहातील एका कवितेत रवींद्रनाथ म्हणतात-

**मी धन्य आहे कारण मला स्वर्गीय प्रकाश दिसतो आहे**
**मी धन्य आहे कारण माझे या विश्वावर प्रेम आहे**

रवींद्रनाथांची कवितादेखील वैश्विक अनुभूती प्रकट करणारी. दीडशे वर्षे होऊन गेली तरी आजही तिचा सौरभ कायम आहे. निसर्गसौंदर्याच्या विभ्रमांची त्यांच्या मनःपिंडाला ओढ होती. त्याच्या प्रेरणेतूनच त्यांची आत्मिक स्पंदने काव्यरूपाने प्रस्फुटित व्हायची. त्यांच्या कवितेविषयी प्रा. सुकुमार सेन म्हणतात-

'टागोरांचे काव्य हे जितके बंगाली काव्य आहे, तितकेच ते भारतीय काव्य व वैश्विक काव्यही आहे. कारण ते शाश्वत जीवनस्त्रोतांच्या अगदी तळापर्यंत जाते. विश्वनिर्मितीच्या मुलस्त्रोताचा व जीवनाच्या चिरंतनत्वाचा सर्वप्रकारे शोध घेते.' (बंगाली साहित्याचा इतिहास -प्रा.सुकुमार सेन, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पृ.२३३)

रवींद्रनाथांनी समग्र कविता संपादित करणाऱ्या संपादकाला उद्देशून आपली भूमिका मांडलेली आहे- 'तुम्ही ज्याला रवींद्रनाथ म्हणून ओळखता त्याच्याकडे मीही एक व्यक्ती म्हणूनच बघतो. ही व्यक्ती म्हणजे वृक्षलतांसारखा, फुला-पानांसारखा निसर्गातील एक पदार्थच आहे. जर तो सौंदर्याने बहरून आला तर चांगलेच, पण गळून पडला तरीही फारसे काही बिघडत नाही. प्रतिदिन अशा कितीतरी घटना घडतच असतात. पण मी आता या गोष्टींच्या पलीकडे निघून गेलो आहे.'

व्यक्तिगत 'मी'पण आणि वैश्विक अस्तित्व या दोहोंमधील असलेल्या अभिन्न नात्याचा स्पष्ट उच्चार 'उत्सर्ग' या संग्रहातील एका कवितेत रवींद्रनाथांनी केलेला आहे-
'फुलांच्या वक्षात थरथरणारा गंध, प्रभातकिरणांत घुमणारे गाणे, शरदकाली शेतावर चालणारे छाया-प्रकाशाचे चंचल नृत्य, त्यामुळे हिरव्यागार- सोनेरी रंगात हसणारी किरणे, या सर्व गंधांनी मिळून माझे शरीर घडलेले आहे. तेच गाणे माझ्या मनात नित्यनूतन आभास निर्माण करते, त्याच प्रभेचे प्रतिबिंब माझ्या डोळ्यांमध्ये पडलेले आहे, मग मी फक्त माझ्यातच सामावून कसा राहू शकेन ?'

रवींद्रनाथ जसे प्रतिभासंपन्न कवी होते, तसेच द्रष्टे विचारवंत होते. त्यांनी हाताळलेल्या अन्य वाङ्मयप्रकारांतही त्यांच्या निसर्गप्रेमाचे प्रतिबिंब पडलेले आहे. वैचारिक निबंधात 'छिन्न पत्रे'मध्येही ते दिसते. वास्तविक पाहता वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे असे विभाजन करताच येत नाही. सर्वार्थाने त्यात एकात्मता आढळते. रवींद्रनाथांच्या सर्व प्रकारच्या वाङ्मयातून कवितेचा मूळबंध दृग्गोचर होतो.

आपण ज्या भूमीत जन्म घेतो, ज्या परिसराचा आपल्यावर संस्कार होतो, त्यातून आपले व्यक्तित्व घडते. आजच्या गतिमान युगात 'पर्यावरण' या संज्ञेला नवा अर्थ प्राप्त झालेला आहे. व्यापक संदर्भही त्याला लाभलेला आहे. अनेक भितींमुळे अनेक कंगोरेही त्याला पडलेले आहेत. आज माणसाकडून वसुंधरेच्या विनाशाची प्रक्रिया घडते आहे. ऐहिक सुखवर्धन कुणाला नको आहे? पण तेच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट मानून विनाशकारी शक्तीमुळे पृथ्वीवरील प्रदूषण वाढलेले आहे. तेवढ्यापुरते ते मर्यादित राहत नाही. सुंदर जग विरूप करणाऱ्या हातांमुळे मानवी मूल्यांचेही प्रदूषण झालेले आहे. या संदर्भात रवींद्रनाथांनी द्रष्टेपणाने मांडलेले विचार आपल्याला आजही अंतर्मुख करणारे आहेत. युरोपात प्रवास करीत असताना १८९१ मध्ये पतिसरहून लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात-

'आई धरित्रीमाता लोकालयांत आपली मुलंबाळं आणि त्यांचा आरडाओरडा त्यांच्यासकट घरकाम करीत राहिली आहे. जिथं थोडासा उघडा, थोडीशी निःस्तब्धता, थोडंसं उघडं आकाश, तिथंच तिच्या विशाल हृदयाचं अंन्तर्नीत वैराग्य आणि विषाद फुटून उठतो. तिथंच तिचा गंभीर दीर्घनिःश्वास ऐकू येतो. भारतवर्षात जसं बाधाहीन परिष्कार आकाश आणि खूप दूर विस्तारलेली समतल भूमी आहे, तशी युरोपात कुठं आहे की नाही, याची शंका आहे.

- पाश्चात्त्य जगाच्या अंधानुकरणाने आपली 'सुजलाम सुफलाम' भूमी आज शतकानंतर तशीच राहिली आहे का, हा प्रश्न आपण स्वतःलाच विचारून बघायला हवा. आपले नदीकाठ, आपले समुद्रकिनारे यांच्याकडे नजर टाकावी.

१६ सप्टेंबर १९२९ रोजी लिहिलेल्या पत्रात रवींद्रनाथ म्हणतात-

'झाडाच्या फांदीला फूल येतं. तोच त्याचा आसरा. पण माणूस त्याला आपल्याच मनानं स्थान देतो, नाव देऊन. माणूस आपल्या मनात त्यांचा स्वीकार करीत नाही. फुलांच्या बाबतीत अशी उपेक्षा दुसऱ्या कुठल्याच देशात नाही. कदाचित त्याला नाव असेल पण

ते नाव अख्यात. काही फुलं नावाजली आहेत, पण ती सुवासाच्या जोरावर. अर्थात उदासीन माणूस त्यांच्याकडे दृष्टिक्षेप करायला तयार झाला नाही, तरी ती आपल्या सुवासानं स्वतःची ओळख करून देतात... ज्याचं नाव माहिती नाही. असे किती सुंदर पक्षी आहेत! हे प्रकृतिगत औदासिन्य म्हणजे आमच्या साऱ्या पराभवाचं मूळ'

'ज्या झाडाला सुवासिक फूल येतं, त्याला खाण्याजोगं फळ आलं नाही तरी चालेल', असे ते आणखी एका पत्रात म्हणतात.

टागोर कुटुंबाची विस्तृत जमीनजुमल्याची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी रवींद्रनाथांकडे १८९१ ते१८९७ च्या दरम्यान आली. उत्तर बंगालच्या आणि ओरिसाच्या काही भागात त्यांना भ्रमंती करावी लागली. बहुतेक प्रवास नौकांमधून करावा लागे. बंगालच्या नद्यांकाठाच्या ग्रामीण वातावरणाशी, निसर्गाशी आणि माणसांशी त्यांचा निकटचा संबंध आला. त्यांच्या 'सोनार तरी' (सोन्याची नौका, १८९३) या कवितासंग्रहात निसर्गाच्या निकट सहवासाचे आणि वस्तुनिष्ठ जीवनाचे प्रतिबिंब आढळते. 'वसुंधरा' या कवितेत रवींद्रनाथ जीवनानुभवाच्या तळाशी पोचलेले आहेत. त्यांना स्वतःच्या हृदयाच्या डोक्यात विश्वनिर्मितीचे आदिम स्पंदन ऐकू येते. विश्वाच्या आत्म्याशी त्यांचा आत्मा एकरूप होऊन जातो. ते स्थल-काल-निरपेक्ष आनंद अनुभवतात. पृथ्वीविषयीचे उदंड प्रेम येथे व्यक्त झालेले आहे.

'तू माझी पृथ्वी आहेस. अनंतकाळापासून तू माझीच आहेस. मला धुळीत लपवून ठेवून, या अनंत विश्वाच्या पोकळीत तू अविश्रांतपणे सूर्याच्या कक्षेत भ्रमण करते आहेस. म्हणूनच कधीतरी पद्मा नदीच्या तीरावर एकांतात बसलो असता, माझी दृष्टी तुझ्याकडे स्थिर होते. खोल भूगर्भातून चिमुकले तृणांकूर फुटताना जसे होत असेल, तशीच शिरशिरी माझ्या गात्रागात्रांत आणि मनात जाणवते.'

पृथ्वीवर असे प्रेम करणारा रवींद्रनाथांसारखा कवी दुर्मिळ. पहाट, दुपार आणि रात्र या प्रहरांचे त्यांनी समरसून वर्णन केलेले आहे. क्षणतरंगाचे चित्रण करताना त्याच्यातील चित्रकार जागृत असतो. त्यांच्या सौंदर्योपासक पिंडाचे दर्शन अनेक ठिकाणी घडते. 'वैशाख' या कवितेत शांतीनिकेतनच्या माळरानावर पसरलेली उन्हाळ्यातील तळपती दुपारदेखील त्यांच्या मनाला मोह घालते. 'जणू काही एखाद्या विनम्र आणि उपवास करणाऱ्या योग्याने तपश्चर्येला बसण्यासाठी अंथरलेली ती चटईच आहे', अशी कल्पना त्यांनी केलेली आहे. ऋतूचक्राच्या विभ्रमांचे त्यांनी विलोभनीय चित्रण केलेले आहे. कालिदासाप्रमाणे पर्जन्यकाल हा त्यांचा आवडता. पाऊस येण्यापूर्वीची पृथ्वीची असोशी, पाऊस पडल्यानंतरची आसमंतातील मृद्गंधाची लकेर, पहाटे आणि सायंकाळी दाटून येणारे कृष्णमेघ व रात्रीच्या स्तब्धतेत अविरत कोसळणाऱ्या जलधारांचे नृत्य, अशी नितान्तरमणीय चित्रे त्यांनी तन्मयतेने आपल्या कवितांमधून रेखाटली आहेत. त्यात त्यांनी मानवी जीवनातील सुखःदुखांचे ताणे-बाणे गुंफलेले आहेत. अशावेळी निसर्ग आणि माणूस यांच्या अद्वैतानुभूतीची आल्हाददायी रूपकळा त्यांच्या कवितेला प्राप्त होते.

माणसाच्या जीवनातील सर्वांत आनंदमय भाग म्हणजे विश्वचैतन्याशी एकरूप होणे. सतःचित आणि आनंद ही त्रिपुटी आहे. तिची परिणती 'आनंदा'त होते, असे भारतीय जीवनधारा सांगते. ही आंतरिक अनुभूती रवींद्रनाथांच्या दृष्टीने निसर्गसहवासातच मिळू शकते. ती शाश्वत असते. बाह्य जगताशी संबंधित माणसाचे आयुष्य क्षणभंगुर असते, असे त्यांना वाटते. आपल्या अंतःप्रेरणांशी निगडित निसर्ग आणि परिसर त्यांनी किती प्रगल्भतेने समजून घेतला होता, याचा पदोपदी प्रत्यय येतो. उत्तरायुष्यात रवींद्रनाथांची भावस्थिती स्थितप्रज्ञासारखी झाली होती. १९४० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'रोगशय्या या संग्रहातील एका कवितेत ते म्हणतात-

'ज्या काही गोष्टींची अभिलाषा धरली होती, त्यांना आवळणारे माझे हातच जेव्हा गळून पडतात, तेव्हा त्या बंधमुक्त अवस्थेत निर्माण होणारी जाणीव ही प्रभातकिरणांसारखी असते. ती अवस्था शून्यमय असूनही शून्य नसते. त्यावेळी मला ऋषींचे शब्द आठवतात- अवकाश जर आनंदाने परिपूर्ण झालेला नसता, तर देहावर आणि आत्म्यावर जडतेचे नागपाश आवळले गेले असते. खरोखर अवकाशाच्या रोमरोमांत हा आनंद संचारला नसता, तर कुणालाही श्वासनिश्वास सोडता आले नसते.'

रवींद्रनाथांना अभिप्रेत असणारी निसर्गविषयक जाणीव येथे प्रभावीरीत्या अधोरेखित झालेली आहे. अशाचप्रकारची भावकृती त्यांच्या 'दिनावसान' या कवितेत थोड्या निराळ्या पद्धतीने व्यक्त झालेली आहे. आपण ज्यादिवशी या जगाचा निरोप घेणार त्याविषयी कवी उद्गारतो- 'माझ्या देहातील प्राण विश्वव्यापी होऊन या निसर्गातील आणि माणसांमधील सर्व चांगल्या, मधुर व सहज गोष्टीमध्ये चिरंतन होऊन जातील.'

आपल्या मृत्यूच्या निमित्ताने सभा भरवणे आणि कालांतराने स्मारके उभारणे ही कल्पनाच रवींद्रनाथांना पसंत नाही- 'माझी स्मृती माझ्या या गीतांमध्येच गुणगुणत राहू द्या. गीतांमध्येच देवदारू वृक्षाची पाने सळसळतात, शिऊली वृक्षाच्या तळाशी क्षणभरच चकाकणारे दवबिंदू हसतात. सूर्यकिरणांच्या मागोमाग सुस्त छाया पसरते, माझ्या कामाची वेळ कार्यरूपाने क्रीडा करते आणि माझा विश्रांतीचा काळ नानारंगी स्वप्नांचे दिवे लावून रूपसौंदर्याची परडी शिगोशीग भरून टाकतो.'

मोकळ्या वातावरणात, वृक्षवल्लरींच्या सावलीत आणि अनंत आकाशाचा नीलिमा निरखीत विद्यार्थ्यांना विद्यादान करावे, या हेतूने रवींद्रनाथांनी 'शांतिनिकेतन' सुरू केले. अशा पर्यावरणात मुलांची मने अभिरुचिसंपन्न होतील, विराट विश्वाच्या सौंदर्याचा साक्षात्कार त्यांना होईल आणि बीजरूपाने सर्जनशीलतेचा उगम होईल. नवनिर्माणाची ही प्रकिया आहे असा संकल्प त्यांनी केला. 'शाल्मली' हे त्यांचे कुटीर.

'शांतिनिकेतन'च्या वास्तव्यात 'शारदोत्सव' (१९०८), 'फाल्गुनी' (१९१५) आणि 'वसंत' (१९२३) या सुरवातीच्या नाटकांमधून रवींद्रनाथांनी ऋतूच्या प्रतीकाद्वारे प्रगतिशील मानवी आत्म्याचे निसर्गाशी असलेले सहचर्य आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या

भाववृत्ती चित्रित केलेल्या आहेत.

रवींद्रनाथांच्या निबंधातून त्यांचे निसर्गविषयक विचार प्रकट झालेले आहेत. 'साहित्याचे तात्पर्य' या निबंधात ते म्हणतात-

'भगवतांची आनंदसृष्टी आपल्यामधूनच आपणच उत्साहित होत असते, मानाची आनंदसृष्टी हा तिचाच प्रतिध्वनी, हा जगतसृष्टीच्या आनंदगीताचा झंकार आमच्या हृदयवीणेच्या तारा निरंतर छेडीत असतो. ते जे मानस संगीत, भगवंताच्या सृष्टीच्या प्रतिघाताने आमच्या अंतरात उत्पन्न होणारा तो जो सृष्टीचा आवेग, साहित्य हे त्याचाच विकास.' (निबंधमाला- खंड २- रवींद्रनाथ ठाकूर साहित्य अकादमी, दिल्ली, आवृत्ती २ री पृ.२३९)

माणसाच्या सर्जनशीलतेचा मूलस्त्रोत म्हणजे निसर्ग. अंतिमतः माणूस सर्जनशीलतेतून सौंदर्यशोध घेत असतो. आनंदनिर्मिती करीत असतो. त्याला सर्वांगीण उन्नयनाकडे नेणारी ही दिशा असते. त्याला सुसंगतीकडे नेणे, हे सर्जनशीलतेचे जीवितध्येय असते. हेच या सूत्रमय आशयाद्वारे रवींद्रनाथांना सांगायचे आहे.


निसर्गाच्या सान्निध्यात रवींद्रनाथांना सौंदर्याच्या उन्मेषांचे जे दर्शन घडले, त्यांचे काव्यात्म शैलीत त्यांनी चित्रण केले आहे- 'निर्मळ निळं आकाश. कच्च्या सोन्याच्या रंगाची उन्हं. पातळ रेशमी चादरीनं झाकलेल्या पहाडावर नागाधिराजाच्या तुषार किरीटाचा महिमा. महादेवाचं ध्यानोदीप्त शुभ्र ललाट. आमच्या जवळच्या डोंगर पठारावरच्या वनावनांतून स्निग्ध हिरवा रंग लागला आहे परिसराच्या स्पर्शानं. पानापानांवर जागले आहेत सोन्याचे रोमांच. निळ्या निःस्तब्धतेच्यावर पक्ष्यांच्या मिश्रित किलबिलाटाच्या नीलांबरी कापडावर जरीच्या कामासारखं झिळमिळ करत आहे.' (कालिम्पाँग, १४ मे १९३८)

चित्र आणि काव्य यांची गळामिठी येथे पडलेली आहे. रवींद्रनाथांची प्रतिभा निसर्गदर्शनाने फुली फुलून येते. परिणतप्रज्ञ वयात ती नवोन्मेषशालिनी राहिली होती... याचे कारण निसर्गाच्या चिरसौंदर्याचा त्यांच्या कविमनाला साक्षात्कार झालेला होता.

'कविता ही आपली 'लहानपणापासूनची, बहुकालाची अनुरागिणी आणि संगिनी आहे', असे जरी रवींद्रनाथ म्हणत असले तरी, त्यांचे गद्यवाङ्मयही काव्याची रूपकळा धारण करीत असे याचा येथे प्रत्यय येतो. रवींद्रनाथांच्या या विचार शिल्पामधून त्यांचे निसर्गविषयीचे, परिसराविषयीचे ममत्व दिसून येते. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. संक्षेपाने सांगायचे झाल्यास रवींद्रनाथांसारख्या समृद्ध जीवन जगलेल्या कवीची महत्ता त्यांच्या परिसरविषयक जाणिवेत आहे. निर्मितीशील प्रतिभावंताच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेताना तो ज्या निसर्गाच्या सान्निध्यात वाढला, ज्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात त्याला सर्जनशीलतेची अंतःप्रेरणा मिळाली, त्याचे अक्षांश-रेखांश ध्यानात घ्यावे लागतात. ज्या बंगभूमीत रवींद्रनाथांची प्रतिभा फुलली, तिचे आयाम या दृष्टीने न्याहाळावे लागतील. ते भारतीय प्रबोधनाचे अपत्य आहे हे लक्षात येईल.

●●●

दीपावलीच्या तमाम गोवेकरांना हार्दिक शुभेच्छा



**श्री. रमेश तवडकर**

**आमदार, पैंगीण मतदारसंघ**

**भारतीय जनता पक्ष - दक्षिण गोवा जिल्हा अध्यक्ष**